दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com


**उद्या अंक नाही**

आज गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०२४ “स्वातंत्र्य दिनानिमित्त ” दै. आरंभ पर्व कार्यालयाला सुट्टी असल्याने शुक्रवार, दि. १६ ऑगस्ट २०२४ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापकीय संपादक


**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०१ ● अंक : २९३ ● गुरुवार, दि. १५ ऑगस्ट २०२४ ● टी.सी.नं. - एमएएचएमआर५२३२५ ● एसडीएम नं. - एसडीएम/एसआर.६०/२०२३ ● पुणे ● मराठी दैनिक (रविवार सोडून) ● पाने ४ ● किंमत : २ रूपये

● Volum : 1 ● Issue : 293 ● Thursday, 15 August 2024 ● Title Code. - MAHMAR52325 ● SDM No. SDM/SR/60/2023 ● Pune ● Marathi Dainik (Monday To Saturday) ● Page : 4 ● Price : 2 Rs/-


# सिंहगड रस्त्यावर धुळीचे साम्राज्य

## वाहनचालकांसह नागरिक हैराण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सलग आठ दिवस पाऊस झालेल्या संततधारेमुळे सिंहगड रस्ता परिसरातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते. पावसाने उघडीप दिल्यानंतर दिवसभर स्वच्छ सूर्यप्रकाश पडत आहे. तर अगोदर सततचा पाऊस आणि आता धुळीचे साम्राज्य यामुळे स्थानिक नागरिक विशेषता दुचाकीधारक हैराण झाले आहेत. मागील दोन आठवड्यापूर्वी पावसाने संततधार धरली होती. त्यामुळे रस्त्यावर पाणी साचून अनेक ठिकाणी रस्त्यांची चाळण झाली असल्याचे चित्र आहे. रस्त्यावरील मोठमोठे खड्डे वाचवतांना वाहनधारकांना भर पावसात दुचाकी चालवताना कसरत करावी लागत होती.आता पावसाने पूर्णता उघडीप दिल्यानंतर रस्त्यांवर धुळीच्या साम्राज्याने कब्जा केला आहे. सिंहगड रस्त्यावरील धायरी फाटा ते खडकवासला रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर माती असल्याने धूळ उडून वाहनचालकांच्या डोळ्यात जात आहे. आता तर ऊन पडल्यामुळे रस्ते कोरडे झाले असून डांबरी रस्त्यावरील कच बाहेर आली आहे. वाहन त्यावरून गेले की धुळ मोठ्या प्रमाणात उडत आहे. यामुळे दुचाकी धारकांना पुढच्या मोठ्या गाडीच्या मागे वाहन चालवताना धुळीचा मारा सहन करत आपले वाहन चालवावे लागत आहे. धायरीत असणाऱ्या आर एम सी प्लांटवरून येणारे डंपरच्या चाकात अडकलेली माती सिंहगड रस्त्यावर पडत असल्याने रस्त्याला मातीचे मोठमोठे ढीग तयार झालेले आहेत. रस्त्यावरील मातीमुळे प्रचंड प्रमाणात धूळ उडत असल्याने दुचाकीधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच धुळीमुळे समोरील वाहन दिसत नसल्याने दुचाकीस्वारांमध्ये अपघाताच्या घटनाही घडत असून, ज्याठिकाणी मातीचे ढीग आहेत तेथील स्वच्छता करून या मातीच्या रस्त्यावर पाणी शिंपडण्याची मागणी वाहनधारकांकडून होत आहे. धायरी फाटा ते खडकवासला दरम्यानच्या रस्त्यावरून मोठे व अवजड वाहन गेल्यास प्रचंड धूळ उडते या धुळीमुळे समोरचे काहीच दिसत नसल्याने दुचाकीस्वारांचे अपघात होऊ शकतात. रस्त्यावर प्रचंड माती असल्याने वाहनांच्या वर्दळीमुळे मोठ्या प्रमाणावर धूळ उडत आहे. ही धूळ रस्त्याच्या आजूबाजूला असलेल्या घरांमध्ये जात असल्यामुळे नागरिकांनाही या धुळीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दिवसभर अवजड वाहनांची वर्दळ राहत असल्याने उडणारी धूळ सरळ घरात येते.



या धुळीमुळे रस्त्यावरून नियमित ये-जा करणाऱ्यांना खोकला, त्वचारोग आदींना सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावर असणारी माती उचलावी अशी मागणी त्रस्त वाहनधारक व नागरिक यांचेकडून करण्यात येत आहे.



# ‘डीएसके’चे ठेवीदार आंदोलनाच्या पावित्र्यात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

डीएसके ग्रुपच्या ठेवीदारांना ठेवी परत मिळाव्यात, यासाठी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात येणार आहे. ठेवी परत देण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावेत. ठेवी परत न मिळाल्यास आक्रमक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ठेवीदारांच्या वतीने बुधवारी (ता.14) पत्रकार परिषदेत देण्यात आला.

या पत्रकार परिषदेस आनंद दवे, नीता जोशी, आदिती जोशी, ठेवीदार संघटनेचे दीपक फडणीस, श्रीकांत अडूळकर, सुधीर गोसावी, मनोज तारे, श्वेता कुलकर्णी, विद्या घटवाई, मेघा म्हसवड, उमेश कुलकर्णी, नितीन जोशी यांच्यासह चैतन्य सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

डीएसके ग्रुपच्या मालमत्तेचे रेडीरेकनरनुसार बाजार मूल्य अधिक असताना त्याची कमी दरात विक्री केली. सुमारे 32 हजार ठेवीदारांची फसवणूक करण्यात आली आहे. याबाबत दोषींची चौकशी करण्यात यावी.

राज्य सरकारने ठेवीदारांना पैसे परत करण्यासाठी प्रयत्न करावेत. अन्यथा आगामी निवडणुकीत ठेवीदार योग्य निर्णय घेतील. यापुढील काळात आक्रमक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या वेळी त्यांनी ठेवीदारांच्या वतीने दिला.


















# बारामती Agro ची खाटीक विरोधी व्यवसाय साखळी ?

खाटीक समाजाला संपवून, हा व्यवसाय संपूर्ण पणे मुस्लिमांकडे कडे सुपूर्द करण्याचा कट तर रचला जात नाहीये ना?

चिकन म्हटले तर, शरद पवार यांचे नातू रोहित पवार यांच्या बारामती अॅग्रो चे नाव पहिले समोर येते. बारामती अॅग्रो हे आता चिकन चे ब्रँड अँब्सिसिडर झाले आहे. आपल्या घराच्या आसपास एखादे तरी बारामती अॅग्रो चे दुकान असतेच. चिकन घेताना आपण ते फ्रेश आहे कि नाही याची खात्री करतो, परंतु ते दुकान कोण चालवते, आणि त्या दुकानामध्ये कोण काम करते याच्या बद्दल आपण कधीच विचार करत नाहीत. वर वर बघितले तर, त्या दुकानाचं मालक कोण आहे, त्या दुकानांमध्ये कोण काम करतात, त्यांचा धर्म काय, त्यांची जात काय, या सर्व गोष्टींशी आपला काही संबंध नसतो. परंतु, जर थोडं लक्ष घालून थोडीशी विचारपूस केली, तर आपल्या लक्षात येईल कि शक्यतो दुकान एखादा मुस्लिम चालवतो, आणि तिथे काम करणारे सगळे मुस्लिम आहेत. त्यातही बंगाली मुस्लिम जास्त आहेत आणि अंदाज येत नाहीये की भारतीय आहे की बांगलादेशी. पारंपरिक रित्या सांगायचे झाले तर हा व्यवसाय खाटीक समाजाचा आहे. मग एकही खाटीक आपल्याला चिकन विकताना का दिसून येत नाही? रोहित पवार आणि त्यांच्या आजोबांच्या कृपेने या व्यवसाया वरती आता मुस्लिम समाजाचे वर्चस्व स्थापित झाले आहे. बारामती अॅग्रो हि एक महाराष्ट्रातील कंपनी आहे, परंतु यांच्या दुकानांना मध्ये काम करणारे हे बाहेरील राज्यांमधील अथवा घुसखोर आहेत. महाराष्ट्रातील मराठी माणसाला धुत्कारून,, मुस्लिमाना मदत करणे, एका अर्थाने एका विशिष्ठ समाजाच्या पोटवर्ती पाय देत आहेत. 2023 पर्यंत बारामती अॅग्रो, च्या डायरेक्टर पदी एक मुसलमानच होता. 4 मे 2023 मध्ये रफिक भोरी यांनी त्यांच्या पदावरून राजीनामा दिला. महत्वाचे म्हणजे हा राजीनामा अश्या वेळी आला जेव्हा बारामती अॅग्रो वरती ED ची कारवाई होणार होती. ही बाब बऱ्याच लोकांच्या नजरेस




आली आहे आणि त्यांनी हा विषय सोशल मीडिया वरती मांडून हा विषय पुढे आणण्याचा प्रयत्न पण केला आहे. परंतु या विषयाकडे दुर्लक्ष करणे सर्वांनी पसंत केले असावे अथवा हा विषय दाबण्याचा प्रयत्न हि केला गेला असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या ट्विट्स नुसार असे लक्षात आले कि शक्यतो बारामती अॅग्रो द्व्यारे मुस्लिमांना रोजगार प्रदान करण्यात येतो, आणि त्यात हि काही ट्विट्स असेही हायलाईट करतात कि त्या मध्ये प्रामुख्याने रोहिंग्या चा समावेश आहे. हि बाब खूप गंभीर आहे. अश्या वेळी जेव्हा भारतात ठीक ठिकाणी रोहिंग्या मुळे दंगे झाले असतानाही, जर रोहित पवार आणि शरद पवार बारामती अॅग्रो मधून घुसखोर्यांना वाव देत असतील, तर त्यापेक्षा मोठा देशद्रोह नसेल. याची चौकशी नक्की पुढे केली पाहिजे . जर आपण ढोबळ मानाने विचार केला तर समजा, बारामती अॅग्रो चे पुण्य मध्ये 1200 दुकाने असतील, तर त्या मधील किती दुकाने मुस्लिम चालवत असतील. त्यातले किती रोहिंग्या असतील. एक उदाहरण म्हणून अमी केलेल्या सिंहगड ते धायरी मध्ये केल्या एका सर्वे मध्ये असे आढळून आले कि 36 मधील 32 ते 33 चिकन ची दुकाने हि मुस्लिम समाजाची आहे. म्हणजेच याच हिशोबाने जर आपण बाकी गणित केले तर पुण्यामध्ये जवळ जवळ 1100 दुकाने तरी मुस्लिम चालवत आहेत. आटा इथे प्रश्न उपस्थित होतो की, कुठल्याच खाटीक समाजानी बारामती अॅग्रोच्या अंतर्गत चिकन विकण्याचा प्रयत्न केले नसेल का? पुण्यामध्ये खाटीक समाज हा फक्त मटण या पुरती मर्यादित आहेत. परंतु असे का आहे? व्यवसायाचे एक साधे सोपे गणित आहे, जर आपल्याला आपले प्रॉडक्ट विकायचे असेल तर त्यासाठी सिमिलर प्रॉडक्ट विकणाऱ्या डीलर कडे आपण जातो. परंतु इथे असे दिसून येते कि रोहित पवार यांनी खाटीक समाजाकडे पूर्णपणे पाठच फिरवली आहे. रोहित पवार यांनी खाटीक समाजाच्या उदर्निवाह करण्या कडे कधीच लक्ष दिले नाही. आता जे विरोधी पक्ष, रोजगारच्या नावा खाली बोंब मारत आहेत, ते रोहित पवार यांना काही प्रश्न का नाही विचारत? त्यांच्याकडे दुसऱ्यांना रोजगार देण्याचा अधिकार असताना ते का मराठी माणसाला डावलत आहेत? मुस्लिमांना एकप्रकारे रोजगार देऊन, हे ह्यांची वोट बँक तर तयार करत नाहीयेत ना? याचा पण विचार येथे केला पाहिजे. पवार कंपनी भारतात असल्याल्या हिंदूंचे रोजगार काढून ते बाहेरील लोकांना देऊन, फक्त त्यांचे political motive साध्य करत आहेत. आता वरील माहिती वाचून बऱ्याच लोकांना असे प्रश्न पडतील कि मुस्लिम पण चिकन विकूच शकतात आणि काय वाईट आहे, त्यांच्या कडून चिकन घेतले तर? आणि खर सांगायचे झाले तर या भावनेत काहीच चुकीचे नाहीये. परंतु विचार करण्याची बाब हि आहे की, जर लोक मुस्लिम धर्माचे पालन करत नसतील, तर त्यांनी हलाल झालेले चिकन का खायचे? इस्लाम धर्म नुसार, एका विशिष्ठ पद्धतीने त्या जीवाची कत्तल केली जाते. त्यांच्या धर्मामध्ये अनेक शतकांपासून या प्रथेचे पालन केले जाते व कुठलाही मुस्लिम या विशिष्ट पद्धतीचे पालन केल्या शिवाय कत्तल करत नाही. हि पद्धत फक्त इस्लामला मानणाऱ्यांपूर्ती मर्यादित आहे, तरी पण मग एका मुस्लिम नसलेल्या व्यक्तीने ही प्रथा का पाळायची?

# भारतीय स्वदेशी कॉँग्रेस पार्टी महाराष्ट्रात लढणार विधानसभा निवडणुक

## आमची युती जनतेशी, महाराष्ट्राला नंबर 1 च राज्य बनवू: पूनम गुप्ता यांचा शब्द

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

उत्तर प्रदेश, हरियाणा, तेलंगणा आदी राज्यांमध्ये निवडणुका लढवल्यानंतर भारतीय स्वदेशी कॉँग्रेस पार्टी महाराष्ट्रात पक्षाच्या वतीने निवडणूक लढवण्यास सज्ज झाली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा पुनम गुप्ता उर्फ दीदीश्री आणि पक्षाचे राष्ट्रीय सचिव सम्राट करवा यांनी याबाबत पुण्यात पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. महाराष्ट्रात सध्या सर्वच पक्षांची खिचडी झाली आहे; त्यामुळे एक नवा पर्याय म्हणून आम्ही महाराष्ट्रात विधानसभेच्या जास्तीत जास्त जागा लढवण्याचा प्रयत्न करणार आहोत आम्हाला खात्री आहे आमच्या पक्षाला महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद




मिळेल असं पुनम गुप्ता यांनी सांगितले. शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रांमध्ये प्रामुख्याने पक्ष लक्ष देणार आहे याशिवाय महाराष्ट्रातील आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यासाठी पक्ष प्रयत्न करेल अशी माहिती सम्राट कारवा यांनी दिली आहे. महाराष्ट्रातील तरुणांना पक्षात सामील होण्याचा आवाहनही त्यांनी केले.

पूनम गुप्ता म्हणल्या, भ्रष्टाचाराच्या या खेळामुळे निवडणुका अत्यंत महागड्या झाल्या आहेत आणि खऱ्या जननेत्यांना सध्याच्या निवडणूक प्रक्रियेत स्थान मिळालेले नाही. त्यामुळे आम्ही खऱ्या जननेत्यांची निवड करण्यासाठी, सर्व नागरिक, खरे नेते, विविध क्षेत्रातील तज्ञ यांचे स्वागत करण्यासाठी या पक्षाची 'भारतीय स्वदेशी कॉँग्रेस' (BSC) महाराष्ट्रात देखील गुप्त केली आहे. जे इच्छुक आहेत की राजकारणात सामील होऊन देशाच्या खऱ्या घटनात्मक, लोकशाही मूल्यमानांचा पाठपुरावा करण्यासाठी हात मिळवून एकत्र येण्याचाठी भारतीय स्वदेशी कॉँग्रेस पक्ष आपले ध्येय आहे आणि BSC मध्ये आम्ही तुम्हाला खात्री देतो की आम्ही ज्ञान, अनुभव, देशभक्ती, नैतिकता आणि व्यावसायिक विकासाच्या मूल्यांसाठी समर्पित आहोत. आमच्या महाराष्ट्र राज्यात प्रचंड क्षमता आहे त्याचा पुरेपुर वापर करून महाराष्ट्राला देशात क्रमांक 1 चे विकसित राज्य करू.

भारताच्या प्रत्येक नागरिकासाठी नागरिक सशक्तीकरण, सन्मान आणि प्रतिसाद मिळविण्यावर BSC मुख्यतः लक्ष केंद्रीत करेल आणि हे सुनिश्चित करेल की प्रत्येक गावातील शेवटच्या व्यक्तीला योग्य रोजगार, व्यवसाय, शिक्षण सुविधा, स्वदेशी व्यवसायासह तसेच आनंदी, निरोगी, न्यायसंगत आणि सुरक्षित जीवन जगता येईल. भारताच्या संविधानानुसार स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. आगामी सत्रांमध्ये आपल्या उदिष्टांना साध्य करण्यासाठी आम्ही कोणत्या प्रक्रिया आणि पद्धती अवलंबतो याची माहिती यावेळी राष्ट्रिय सचिव सम्राट करवा यांनी दिली.

# डॉ. प्रकाश खापर्डे, प्रा.डॉ.चतुर्भुज भुयान यांना जीवनगौरव पुरस्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आयुर्वेद टिचर्स असोसिएशनतर्फे भारतीय औषध प्रणाली राष्ट्रीय आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच एमसीआयएम, मुंबई यांच्या सहयोगाने 'आयुर्वेदातील नवी क्षितीजे' या विषयावर सहाव्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन पुण्यात करण्यात आले आहे. शनिवार, दि. 17 ऑगस्ट रोजी ऑनलाईन पद्धतीने केंद्रीय आयुर्वेद संशोधन संस्था संचालक डॉ. रविनारायण आचार्य, डॉ. प्रतिभा शाह आयुर्वेद सल्लागार बोस्टन अमेरिका, टी सुरेश कुमार यांच्यासह इतर आयुर्वेद तज्ञ संबोधित करणार आहेत. तर रविवार, दि. 18 ऑगस्ट रोजी सकाळी 9 ते सायंकाळी 5 यावेळेत





शिवदर्शन येथील राजीव गांधी अॅकॅडमी ऑफ ई-लर्निंग स्कूल येथे ही परिषद होणार आहे.

केंद्रीय आयुष, स्वास्थ्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रतापराव जाधव, सचिव डॉ. राजेश कोटेचा, केंद्रीय समिती अध्यक्ष डॉ. रघुराम भट, शिक्षक आमदार जयंत आसगावकर, महाराष्ट्र आयुष संचालक डॉ. रमन घुंग्राळेकर, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक आयुर्वेद अधिष्ठाता डॉ. मिलिंद आवारे या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये यंदाचा जीवनगौरव पुरस्कार उस्मानाबादचे डॉ. प्रकाश खापर्डे आणि ओडिसातील प्रा. डॉ.चतुर्भुज भुयान यांना प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राहुल सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## अफवेने खळबळ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील कमला नेहरू रुग्णालयात बुधवारी (ता. 14) सकाळी दहशतवादी घुसल्याची अफवा पसरल्याने एकच खळबळ उडाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तीन संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीत ते मूळचे बिहारचे असून, वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. बांगलादेशी नागरिक शहरात फिरत असल्याचा संदेश सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आला होता. काहीजणांनी त्यांची छायाचित्रे पोलिस नियंत्रण कक्षाला दिली. ते तिघेजण महापालिकेच्या मंगळवार पेठेतील कमला नेहरू रुग्णालयात सुरक्षा रक्षकांना आढळून आले. सुरक्षा रक्षक रोहित माने, वैभव बोबडे, नितीन लांडगे, विशाल कांबळे यांनी त्याची माहिती रुग्णालयातील डॉक्टरांना दिली. त्यांनी ही बाब पोलिसांना कळविली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.

# बालउद्योजकांनी प्रस्तुत केले Learningis.Fun”

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिक्षणाच्या क्षेत्रात बदल घडवण्यासाठी एक उल्लेखनीय उपक्रम म्हणून, बालउद्योजकांनी "Learningis.Fun" नावाचा एक अभिनव लर्निंग प्लेटफॉर्म (शैक्षणिक मंच) लॉन्च केला आहे, जो मुलांसाठी शिक्षणाला एक आकर्षक आणि परस्परसंवादी अनुभव बनवण्यासाठी तयार केला गेला आहे. हा मंच एक दूरदर्शी बालकांचा गट—श्रेयस पाटणकर (14), शरयू पाटणकर (12), अर्चित कोरके (12), रेयांश बराले (11), आणि अश्विन म्हसकर (18) द्वारे विकसित केला गेला आहे, आणि "मुलांसाठी, मुलांद्वारे" (For kids, By kids) या अनोख्या तत्त्वावर आधारित आहे.

Learningis.Fun आर्थिक समज, भावनिक बुद्धिमत्ता, आणि मुलांनी अनुभवलेल्या दैनंदिन आव्हानांवर 60 पेक्षाजास्त परस्परसंवादी ई-बुक्सचे एक वैविध्यपूर्ण संग्रह प्रदान करते. या ई-बुक्सची खासियत




म्हणजे तंत्रज्ञान-आधारित दृष्टिकोन, जो शिक्षणाला एक रोमांचक प्रवासात बदलतो. प्रत्येक ई-बुक एका कठिण संकल्पनेला समजण्यासाठी सोप्या कथेमध्ये प्रस्तुत करते. प्रत्येक पुस्तकात सुंदर आणि आकर्षक चित्रे आणि आवाज सुविधा (व्हॉईस-ओवर फीचर) आहेत. प्रत्येक पुस्तकाला इंटरएक्टिव्ह (परस्परसंवादी) बनवले आहे, ज्यामुळे वाचक हे कथेतील पात्रांशी प्रत्यक्षात संवाद साधू शकतात.

पुण्यात एका पत्रकार परिषदेत, या बालउद्योजकांनी Learningis.Fun हा लर्निंग प्लेटफॉर्म प्रस्तुत केला आणि शिक्षणाच्या भविष्यासाठी आपली धाडसी दृष्टी मांडली. त्यांनी दाखवून दिले की, त्यांचा मंच केवळ माहितीच देत नाही, तर कथाकथन, इंटरएक्टिव्ह घटक, आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मुलांच्या मनाला आकर्षित करतो. हा अभिनव दृष्टिकोन मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेला आनंददायी बनवण्यास मदत करतो. टीमच्या भविष्यातील योजनादेखील तितक्याच महत्वाकांक्षी आहेत, ज्यात पुढील वर्षात 200 पेक्षा जास्त ई-बुक्सच्या विस्तारीकरणाचे लक्ष्य आहे, जे आजच्या बाल शिक्षार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या व्यापक विषयांशी संबंधित असतील.

Learningis.Fun इतर शैक्षणिक प्लॅटफॉर्मपेक्षा वेगळा आहे कारण तो मुलांनी मुलांसाठी बनवला आहे. त्यामुळे तो उपयोगकर्त्यांना भावतो. Learningis.Fun हा एक असा लर्निंग प्लेटफॉर्म आहे जो जिज्ञासा आणि शिक्षणाच्या प्रतिप्रेमालाही प्रेरित करतो. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेला इमर्सिव शिक्षण अनुभव पारंपारिक शिक्षणपद्धतींपासून या मंचाला वेगळे करतो. Learningis.Fun हा केवळ एक नवीन शिकण्याचा मार्ग नाही—तर ही एक क्रांती आहे, जी मुलांना शिक्षणाला उत्साहाने आणि सर्जनशीलतेने स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करते. हा मंच गेम-चेंजर ठरण्यास तयार आहे, जो शिक्षण देण्याच्या आणि अनुभवण्याच्या पद्धतींना नव्याने परिभाषित करतो आणि ताजेतवाने आणि आकर्षक पर्याय देतो.




## असं ही एक दु:ख

मी नेहमीच म्हणते, बोलते. स्टेजवर असो किंवा चारचौघांत जो पर्यंत माझ्या मतिमंद मुलांना आई आहे तोपर्यंत त्या मुलांचं खरं जीवन आहे,खरं जगणं आहे.पण कधीतरी तेही फाटत. तुटतं... आई असून आईवीना. परस्थिती घडवते. आणि आई आहे या बाळाला एवढं उरत सांगण्या पुरतं.

मी अनाथ मुलांना सांभाळतेच पण एक पालक असलेल्या बाळाला ही. पण खरं सांगू का. आईचं आपल्या बाळाला संभाळते. बाप नावांचा माणूस फक्त हा फक्त नावापुरताच राहतो. काही अपवाद वगळता.

असंच एक....

तीन वर्षे झालं संभाळते. त्या बाळाच्या आईचा कधी फोन येत नाही, तर कधी भेटायला येत नाही.पण मध्ये च फोन आला मॅडम माझ्या मुलाचे वडील मला भांडूणं, मारून सोडून गेले पाच वर्षे झाली. ते आता विचरतात



माझं बाळ कुठे आहे. मी त्याला सांगितले एका संस्था ठेवलं आहे. मी भेटायला घेऊन येते. मी ही लगेच होकार दिला.

तो बाप आला दोन दिवसांनी पणं काय वाटलं कोण जाणे. दोघेजण बोलली आम्ही घेऊन जातो आमच्या मुलाला. मला ही बर वाटलं त्या बाळाला आई बापाचं प्रेम मिळेल सर्व प्रोसेस करून ते घेऊन गेले.

दहा दिवस पण होत नाही त्या बाळाच्या आईचा फोन आला मॅडम मी माझ्या मुलाला घेऊन येते. असं म्हणून फोन ठेवून दिला. बापानं आणून आमच्या शिक्षकांच्या हातात दिलं. जवळ घेतल्यावर लक्षात आले कि याला खूप ताप आहे. तब्बेत ही खालावली. मी त्याला बर करून घेऊन या सांगितले. नाही तर आता औषध उपचार करा.पण ते न ऐकता काल रात्री दिड हजाराची औषध आणली ती घरी विसरून आलो. मी घेऊन येतो दोन तासात बाप नावाचा माणूस म्हणाला. मी वाट पाहात राहिले कि त्याला डॉ. दिलेली योग्य ती औषध मिळतील. रात्री चे दहा वाजेपर्यंत वाट पाहीली. पण तो बाप कांहीं आला नाही. फोन परत कधी उचलला नाही.

त्या रात्री ते बाळ एवढ ताप आला होता. पोटात अन्नाचा कण नसावा एवढी अवस्था होती. माझ्या कडे असलेले औषध दिलं. मिठाच्या पाण्याने स्वच्छ अंग पुसून काढले. रात्र कशी तरी काढली सकाळी डॉक्टरांन कडे घेऊन गेले. तब्येत खूप खराब झाली होती. याला चांगलं बर करा. माझा रडत असलेला चेहरा पाहून मलाही धीर दिला.दोन दिवस हॉस्पिटल मध्ये उपचार सुरु होते. बाळाची आई कुठे पळून गेली माहिती नाही. बाप तर फोन उचलत नाही म्हणून नवीन नंबर वरून फोन केला तुम्ही भेटायला या हो येतो म्हणून . नंतर जो फोन बंद आहे तो आता पर्यंत.....

आता ते बाळ मस्त खेळतं,हसतं!!

आई बापाचं प्रेम पाहून मन मात्र व्यतीत होतय...

*दिपाली निखळ, पुणे*
*संस्थापिका*
*अक्षरस्पर्श मतिमंद निवासी विद्यालय. कात्रज -जांभूळवाडी पुणे*
*संपर्क:88620 25749*

# नवनाथ पारगे यांची जय्यत तयारी

## शिवस्वराज्य यात्रेमध्ये नवनाथ पारगे यांनी लक्ष वेधले





### कार्यकाळात केलेली कामे

कोंढणपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज यांची पूर्णाकृती पुतळा,ग्रामपंचायत,पंचायत समिती,जिल्हा परिषद सदस्य असताना विकास कामे विविध आरोग्य उपकेंद्रे ,शाळा खोल्यांना निधी,यांसारख्या अनेक सुविधा त्यांनी उपलब्ध करून दिल्या. पक्ष न पहाता आलेल्या प्रत्येकाचे काम करणे हेच धोरण अवलंबले. त्याचमुळे,उपसरपंच, ,जिल्हा परिषद व आता विधानसभेची ही संधी त्यांना चालून येत आहे.त्यांचे वडील हे दहा वर्षे गावचे सरपंच होते. त्यामुळे राजकारणाची बाळकडू हे त्यांना घरीच मिळाले. त्यांच्याविषयी मतदारसंघांमध्ये कुतूहल आहे.सर्वसामान्य जनतेचा भाऊ म्हणुन त्यांची ख्याती आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये लक्षवेधी लढत होत आहे. अनेक इच्छुक या विधानसभेसाठी तयार होत आहेत. अशातच खेड शिवापूर जिल्हा परिषद गटाचे माजी सदस्य तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष नेते नवनाथ पारगे हे ही विधानसभेसाठी इच्छुक आहेत. खडकवासला विधानसभा मतदारसंघाच्या ग्रामीण भागामधील एक रांगडे व्यक्तिमत्व व लोकसेवक म्हणून पारगे यांची ओळख आहे.

सिंहगडाच्या पावन भूमी मध्ये छत्रपतींच्या विचारांचा हा मावळा विधानसभेसाठी उतरणार असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे खडकवासला विधानसभा मतदारसंघांमधील राजकीय गणितावर पारगे यांचे प्राबल्य असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

काही दिवसापूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाची शिवस्वराज्य यात्रा खडकवासला विधानसभा मतदारसंघात आली. त्यावेळी नवले लॉन्स येथील शिवस्वराज्य यात्रेत पारगे यांच्या हजारो कार्यकर्त्यांनी डोणजे ते नवले लॉन्स पर्यंत रॅली काढली. व्यासपीठापर्यंत डोक्यावर खांद्यावर घेऊन "एकच वादा नवनाथ दादा" घोषणांनी माहोल तयार झाला. खुद्द प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनीही त्यांचा उल्लेख लोकसेवक म्हणून केला.

यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण संचारले आहे. ह्यां भागातून विधानसभेमध्ये ग्रामीण भागातून तशी फारशी संधी कोणाला मिळाली नाही. नवनाथ पारगे यांना ही संधी मिळणार का याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

शिवस्वराज यात्रा असो वा मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत यामधून त्यानी आपल्या राजकीय नेतृत्वाची चुणूक दाखवून दिली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षांमध्ये इच्छुक उमेदवारामध्ये सचिन दोडकेकाकासाहेब चव्हाण बाळाभाऊ धनकवडे ह्यांच्या सोबत नवनाथ पारगे यांनी आपली दावेदारी सिद्ध केली आहे.

खडकवासला विधानसभा मतदारसंघांचें सर्वाधिक मतदान हे शहरी भागात असले तरीही ग्रामीण भागात अस्तित्व असलेले पारगे यांचा शहरी भागातही जनसंपर्क असल्याने त्यांना एक तगडा उमेदवार म्हणून सर्वजण पाहत आहेत. खडकवासला विधानसभेचा विकासाचा बॅकलाग पूर्ण करू: पारगे

खडकवासला विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक मूलभूत प्रश्नावर दुर्लक्ष झाले आहे.

शहरी भागामध्ये वाहतुकीची भयंकर समस्या आहे. त्यावर समस्या निवारण करू लोकप्रतिनिधींनी काय करायला पाहिजे. हे दाखवून देण्याचा नक्की प्रयत्न केला जाईल.

पक्षाने संधी दिल्यास नक्कीच खडकवासला मतदारसंघ बदलण्याचा प्रयत्न करेल. अन्यथा पक्ष देईल ती जबाबदारी पार पाडून पक्षाचा आमदार आणण्यासाठी जिवाचं रान करणार असा शब्द त्यांनी दिला. आतापर्यंतच्या सर्व निवडणुकांमध्ये खेड शिवापूर जिल्हा परिषद गटातून पक्षाला मताधिक्य देण्यात आपण महत्वपूर्ण भूमिकां निभावली आहे.






दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.